सकाळ दि.16.07.2023

# खुनाच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक

नांदेड, ता. १५ (बातमीदार) : ग्रामिण पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये सिडकोतील अण्णा भाऊ साठे चौक येथे खंडणीच्या कारणावरुन चार आरोपींनी अवधुत काळबा गिरडे (वय १९, रा. असदवन, नांदेड) या युवकाचा शुक्रवारी (ता. १४) खंजरने वार करून खून केला होता. या गुन्ह्यातील दोन आरोपींना शनिवारी (ता. १५) स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.



नांदेड : सिडको येथील युवकाच्या खुनाच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना २४ तासाच्या आत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली.

जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना या गुन्ह्यातील आरोपींना पकडण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक चिखलीकर यांनी वेगवेगळी पथके तयार करुन आरोपीचा शोध घेणे सुरू केले होते. शनिवारी मिळालेल्या माहितीनुसार गुन्हा करणारे आरोपी हे वसंतराराव नाईक कॉलेज सिडको येथे असल्याचे कळाले. त्यानुसार सापळा रचून पथकाने मनप्रीतसिंघ ऊर्फ तेजु चरणसिंघ टाक (वय २०, रा. एनडी ४१, जयभवानीनगर, सिडको) आणि सुमित संतोष सरोदे (वय १९, रा. एनडी ४१, के. टू राहुलनगर, सिडको) यांना २४ तासाच्या आत अटक केली. तसेच गुन्हा केलेले दोन विधीसंघर्षीत बालकाच्या पालकांना नोटीस देण्यात आली आहे. आरोपीतांना ग्रामिण पोलीस ठाण्यात तपासकामी देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांच्या पथकातील सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने, फौजदार सचिन सोनवणे, सहायक फौजदार माधव केंद्रे, संजय केंद्रे, पोलिस जमादार गुंडेराव करले, पोलिस नायक पद्मसिंह कांबळे, दीपक पवार, देवा चव्हाण, मोतीराम पवार, मारोती मोरे, बालाजी यादगीरवाड, धम्मा जाधव, ज्वालासिंघ बावरी, गजानन बयनवाड, चालक अर्जुन शिंदे यांनी पार पाडली.